तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २५ जून २०२५

आतील पानावर
पान २ – 'कन्नप्पा'त अक्षय कुमार दिसणार...
पान ३ – विजय–रश्मिकाच्या लग्नाची चाहत्यांना...
पान ४ – प्रियंकाच्या 'हेड ऑफ स्टेट' चित्रपटाचा...
पान ५ – या अभिनेत्रीला यायचंय सक्रीय ...
पान ६ – 'धुरंधर'मध्ये दिसणार नवा चेहरा

# प्रभासच्या बहुचर्चित 'द राजा साब'चा टीझर रिलीज

'द राजा साब' सिनेमाची सर्वांना गेल्या अनेक दिवसांपासून उत्सुकता होती. या सिनेमात प्रभास प्रमुख भूमिकेत होता. प्रभासचे याआधीचे सिनेमे 'आदिपुरुष' आणि 'कल्की २८९८ एडी' हे इतके चालले नव्हते. त्यामुळे प्रभासच्या आगामी 'द राजा साब' सिनेमाकडून प्रेक्षकांना अपेक्षा होती. अशातच नुकतंच प्रभासच्या 'द राजा साब' सिनेमाचा टीझर रिलीज झाला आहे. या टीझरमध्ये प्रभाससोबत बॉलिवूड अभिनेता संजय दत्तने लाइमलाइट लुटली आहे. संजय दत्त या सिनेमात खलनायकाच्या भूमिकेत दिसणार आहे.


प्रभासच्या आगामी 'द राजा साब' सिनेमाचा टीझर रिलीज झाला आहे. या टीझरमध्ये प्रभास हा शहरात राहणारा एक व्यक्ती दिसून येतो. अशातच प्रभास एका मुलीच्या प्रेमात पडतो. पुढे एक मोठा वाडा दिसतो. या वाड्यात संजय दत्त आक्रमक रुपात बघायला मिळतो. संजय दत्त आणि त्याच्या पुर्वजांचा या वाड्यामध्ये अनोखा इतिहास असतो. पुढे प्रभास या वाड्यात येऊन त्याची गाठ संजय दत्तशी पडते. या वाड्याचं नेमकं रहस्य काय? आणि त्याचं प्रभासशी काय कनेक्शन आहे, हे सिनेमा पाहिल्यानंतरच कळेल. 'द राजा साब' सिनेमाचा टीझर अल्पावधीत चांगलाच व्हायरल झाला आहे.

प्रभासचा हा सिनेमा हॉरर रोमँटिक कॉमेडी असणार आहे. सिनेमात प्रभाससोबत मालविका मोहनन, रिद्धी कुमार, निधी अग्रवाल हे कलाकार दिसणार आहेत. 'बाहुबली' आणि 'सलार' या सुपरहिट सिनेमांचा नायक प्रभास 'द राजा साब' सिनेमातून काय कमाल करणार, यासाठी प्रेक्षकांना काही महिने प्रतीक्षा करावी लागणार आहे. 'द राजा साब' सिनेमा ५ डिसेंबर २०२५ ला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.





# ‘कन्नप्पा’त अक्षय कुमार दिसणार महादेवाच्या रूपात



मुकेश कुमार सिंह दिग्दर्शित ‘कन्नप्पा’ या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. यात अक्षय कुमारने महादेवाच्या भूमिकेत सर्वांचं लक्ष वेधून घेतले आहे. चित्रपटात अभिनेता विष्णु मान्चू यांनी कन्नप्पा या नास्तिक योद्ध्याची भूमिका केली आहे. या ट्रेलरमध्ये कन्नप्पाचा शिवभक्त होण्यापर्यंतचा प्रवास पाहायला मिळतो. २ मिनिटे आणि ५५ सेकंदांच्या ट्रेलरची सुरुवात ‘कन्नप्पा’ पासून होते, जो देवाच्या अस्तित्वाला नाकारतो आणि आपल्या गावातील लोकांना दुष्ट हल्लेखोरांपासून वाचवण्याची जबाबदारी स्वतःवर घेतो. ट्रेलरमध्ये ‘भगवान शिव’ यांची एक झलक दिसते, ज्याची भूमिका अक्षय कुमार यांनी साकारली आहे, ज्यांनी खुलासा केला की ‘कन्नप्पा’ हे त्यांचे कट्टर भक्त बनणार आहेत. ट्रेलर दाखवतो की, कसा एक कट्टर नास्तिक शिवाचा सर्वात मोठा भक्त बनतो. यात अभिनेता प्रभास ‘रुद्र’ या महत्वपूर्ण पात्रात दिसतो, जो महादेवाचं रुप म्हणून पृथ्वीवर कार्य करतो. तर मोहनलाल ‘किरात’ या शक्तिशाली व्यक्तिमत्त्वात दिसणार आहेत. अल्पावधीत या चित्रपटाचा ट्रेलर व्हायरल झाला आहे. ‘कन्नप्पा’ या चित्रपटात मुख्य कलाकारांमध्ये काजल अग्रवाल, मोहन बाबू, सरत कुमार, ब्रह्मानंदम सारख्या कलाकारांचा समावेश आहे. हा चित्रपट २७ जून २०२५ रोजी तेलगूसोबत अन्य भाषांमध्ये रिलीज होणार आहे. ‘कन्नप्पा’ चित्रपटाचा ट्रेलर लाँच इंदौरमध्ये होणार होता, परंतु अहमदाबाद विमान अपघातानंतर अक्षय कुमार- विष्णु मांचू या दोघांनी हा ट्रेलर लाँच पुढे ढकलला आहे.



# आमिरने नाकारली १२० कोटींची ऑफर

अभिनेता आमिर खान सध्या त्याच्या ‘सितारे जमीन पर’ या चित्रपटामुळे चर्चेत आहे. अशातच नुकतीच अभिनेत्याला एक मोठी ऑफर आली होती, परंतु त्याने ती ऑफर नाकारली आहे. आमिर खानने ‘सितारे जमीन पर’ या चित्रपटासाठी तब्बल १२० कोटींची ऑफर नाकारली असल्याचं म्हटलं जात आहे. ‘सितारे जमीन पर’मध्ये आमिर खान मुख्य भूमिकेतून झळकत आहे. आर. एस. प्रसन्न यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे, तर आमिरने या चित्रपटाची निर्मितीही केली आहे. अशातच आमिर खानने नुकतंच या चित्रपटाच्या संदर्भात एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आमिर खानला एका ओटीटी प्लॅटफॉर्मकडून ‘सितारे जमीन पर’ हा चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित न करता त्यांच्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित करण्याची ऑफर आली होती. कोमल नाहटा यांनी सांगितलं, ‘अ‍ॅमेझॉन प्राईम व्हिडीओ’ने आमिर खानला त्याचा चित्रपट ‘अ‍ॅमेझॉन प्राईम व्हिडीओ’वर प्रदर्शित करण्यासाठी तब्बल १२० कोटींची ऑफर दिली होती. मात्र, आमिरने ही ऑफर नाकारली आहे. परंतु, इतर मोठ्या ओटीटी प्लॅटफॉर्मकडून याहून मोठ्या ऑफर याव्या याकरिता त्याने ही ऑफर नाकारली आहे अशी शक्याताही यावेळी वर्तवली जात आहे. कोमल नाहटा पुढे म्हणाल्या, आमिर गेल्या अनेक दिवसांपासून सिनेमा चित्रपटगृहात प्रदर्शित झाल्यानंतर आठ आठवड्यांनी ओटीटवर येतो, या यासंदर्भात चिंता व्यक्त करत आहे; तर या बिझनेस मॉडेलला त्याने दोषही दिला होता. हा चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित न करण्याचा आमिरचा निर्णय योग्य ठरला आणि बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाने चांगली कमाई केली तर यानंतर अनेक चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित न होता चित्रपटगृहात प्रदर्शित केले जाण्याची शक्याता आहे. यामुळे इंडस्ट्रीमध्ये मोठा बदल घडू शकतो. पण, जर या चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळाला नाही तर ओटीटीसारख्या मार्गाने १२० कोटी कमावण्याची संधी आमिरच्या हातून गेलेली असेल.

# मी अजूनही कामाची वाट पाहतेय!

अभिनेता नेटफ्लिक्सवरील संजय लीला भन्साळी दिग्दर्शित हिरामंडी: द डायमंड बाजार ही वेबसिरीज लोकप्रिय ठरली. या सिरीजमध्ये बॉलीवूड अभिनेत्री अदिती राव हैदरीने बिब्बोजान ही भूमिका साकारली होती. तिच्या या भूमिकेचे प्रेक्षकांनी भरभरून कौतुक केले. मात्र, नुकत्याच झालेल्या एका मुलाखती दरम्यान अभिनेत्रीने खंत व्यक्त केली आहे. हिरामंडी या भव्य सिरीजने अदितीला मोठं यश मिळवून दिले. मात्र, या सिरीजनंतर तिला कोणतीही सिरीज किंवा चित्रपटाची ऑफर मिळालेली नाही. मी अजूनही कामाच्या संधीची वाट पाहत असल्याची खंत अभिनेत्री अदिती राव हैदरीने व्यक्त केली आहे. हिरामंडी मालिकेमुळे मला प्रचंड प्रेम आणि प्रशंसा मिळाली. प्रेक्षकांनी आणि इंडस्ट्रीतील लोकांनी माझं काम आवडलं असल्याचं सांगितलं. पण या यशानंतरही अजूनपर्यंत मी काहीच नवीन प्रोजेक्ट साइन केले नाही. मी अजूनही कामाच्या संधींची वाट पाहतेय, असे अभिनेत्री अदिती राव हिने मुलाखती दरम्यान सांगितले. तिने केलेल्या या विधानामुळे बॉलिवूडमधील सुरू असलेली स्पर्धा पुन्हा एकदा अधोरिखेत झाली आहे. तसेच महिला कलाकारांसमोरील संधींच्या मर्यादा पुन्हा एकदा चर्चेत आल्या आहेत. या काळात अदितीने अभिनेता सिद्धार्थसोबत लग्न केले असून आपल्या नव्या आयुष्याची सुरूवात केली आहे. करिअरमधील ‘ड्राय स्पेल’मुळेच लग्नाचा निर्णय घेतल्याचे तिने स्पष्ट केले आहे.



# अल्लू अर्जुन दिसणार शक्तिमानच्या भूमिकेत

'मासूम' नवदच्या दशकातील मुलांच्या हृदयात 'शक्तिमान' या टीव्ही शोचे एक विशेष स्थान आहे. त्यावेळी मुकेश खन्ना यांनी 'शक्तिमान' या अवतारात मुलांचे खूप मनोरंजन केले. या आयकॉनिक शोच्या पुनरागमनाची चर्चा बऱ्याच काळापासून सुरू होती. आता असे वृत्त आहे की अल्लू अर्जुन आता 'शक्तिमान' म्हणून परतणार आहे. आता हा चित्रपट बेसिल जोसेफच्या दिग्दर्शनाखाली बनवला जाणार आहे. वृत्तांनुसार, मुकेश खन्ना यांनी स्वतः अल्लू अर्जुनला या भूमिकेसाठी पाठिंबा दिला आहे. अनेक वर्षांपासून मुलांचा आवडता शो 'शक्तिमान'च्या पुनरागमनाची चर्चा होती. तथापि, कोणीही परिपूर्ण नसल्यामुळे हा शो पुन्हा बनवला जात नव्हता. परंतु आता निर्मात्यांना 'शक्तिमान'च्या भूमिकेसाठी एक नवीन चेहरा सापडला आहे. एका वृत्तानुसार, दक्षिणेचा सुपरस्टार अल्लू अर्जुन शक्तीमानच्या भूमिकेत दिसू शकतो. मल्याळम सुपरहिरो चित्रपट 'मिन्नल मुरली' बनवणारे दिग्दर्शक बेसिल जोसेफ यांची या मेगा व्हेंचरचे दिग्दर्शन करण्यासाठी निवड करण्यात आली आहे. हा प्रकल्प सोनी पिक्चर्सचा आहे आणि या सुपरहिरोच्या जुन्या प्रतिष्ठेचा सन्मान करणे आणि नवीन तंत्रे जोडणे हे या टीमचे उद्दिष्ट आहे. २०२४ मध्ये एक व्हिडिओ अपलोड करताना, मुकेश खन्ना यांनी सुचवले की शक्तीमानच्या भूमिकेसाठी अल्लू अर्जुनची निवड करावी. तथापि, त्यांनी अंतिम निर्णय निर्मात्यांवर सोडला. पुष्पा आणि पुष्पा २ च्या यशानंतर, आज अल्लू अर्जुनला कोणत्याही ओळखीची आवश्यकता नाही. आता हा नवीन सबके शक्तीमान त्याच्या संपूर्ण भारतातील प्रतिमेसाठी खूप उपयुक्त ठरू शकतो. आता पुष्पा २ नंतर, अल्लू अर्जुन शक्तीमान म्हणून भारताचा पुढील सुपरहिरो बनण्याची तयारी करत आहे.

# विजय-रश्मिकाच्या लग्नाची चाहत्यांना प्रतिक्षा

नॅशनल क्रश रश्मिका मंदाना आणि अभिनेता विजय देवरकोंडा हे दोघेही रिलेशनशिपमध्ये असल्याच्या चर्चा नेहमी होत असतात. सध्या सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल झाला असून हा व्हिडीओ पाहून विजय-रश्मिका यांच्या चाहत्यांनी लग्नाची वाट पाहत आहोत, अशा प्रकारच्या कमेंट्स व्हायरल होणाऱ्या व्हिडीओवर केल्या आहेत. त्यामुळे दोघेही पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. रश्मिका विजय यांच्या चाहत्यांना दोघांच्या रिलेशनशिपच्या सुरू असलेल्या बातम्या जाणून घ्यायला खूप आवडते. नुकतेच दोघेही मुंबई विमानतळावर एकत्रित दिसले. विमानतळावरून दोघेही एकाच कारमध्ये रवाना झाले. नुकत्याच व्हायरल झालेल्या या व्हिडीओमुळे विजय रश्मिकाच्या रिलेशनशिपच्या चर्चा पुन्हा एकदा सिनेविश्वात रंगू लागल्या आहेत. या व्हायरल झालेल्या व्हिडीओमुळे चाहत्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले असून दोघेही एकमेकांना डेट करत आहेत का असा मुख्य प्रश्न आता विचारला जात आहे. नुकतेच विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदाना मुंबई विमानतळावरून कारमधून एकत्रित जात असताना पापाराझींनी त्यांना बोलत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, दोघांनीही कोणतेही उत्तर दिले नाही. दोघांचा व्हिडीओ पापाराझी पेज ताहिर जासूससह तसेच अनेक अधिकृत पेजवर शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओत दोघांच्याही तोंडावर मास्क असल्याचे दिसत आहे. दरम्यान, पापाराझींनी त्यांचा एक व्हिडीओ बनवला असून ज्यामध्ये त्यांचे चेहरे दिसत आहेत. यामुळे दोघांचे चाहते त्यांच्या लग्नासाठी उत्सुक झाले आहेत.






# यशने पुन्हा जिंकले चाहत्यांचे मनं

बॉलिवूड अभिनेत्री कियारा अडवाणी सध्या प्रेग्नेंट आहे. मात्र तरीही ती शुटींगमध्ये व्यस्त आहे. लवकरच ती केजीएफ फेम यशसोबत 'टॉक्सिक' या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. मात्र त्यापूर्वी यशने पुन्हा एकदा चाहत्यांची मनं जिंकून घेतले आहे. अभिनेत्याने या चित्रपटाचे शूटिंगचे वेळापत्रक मुंबईला हलवले आहे. जेणेकरून कियारा अडवाणीला हे ठिकाण सोईस्कर ठरू शकेल. यशने त्याच्या 'टॉक्सिक' चित्रपटाचे दिग्दर्शक गीतू मोहनदास आणि निर्माते वेंकट के नारायण यांना सर्व शूटिंग औपचारिकता बंगळुरूहून मुंबईत हलवण्यास सांगितले होते. यशने निर्मात्यांना सहकार्य केले आणि ते मुंबईत हलवले. त्याच्या या निर्णयाचे कौतुक केले जात आहे. कियाराने आणि तिचा पती सिद्धार्थ मल्होत्राने मार्चमध्ये अभिनेत्रीच्या प्रेग्नेंसीची बातमी जाहीर केली होती. त्यांनी इंस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करत लिहिले होते की, 'आमच्या आयुष्यातील सर्वात मोठी भेट लवकरच येत आहे,' असे सांगितले. त्यानंतर त्यांच्यावर नेटकऱ्यांसह कलारांकडून शुभेच्छांचा वर्षाव झाला. 'टॉक्सिक' चित्रपटाच्या समोर आलेल्या पोस्टरमध्ये यश काळ्या लेदर जॅकेट आणि टोपीमध्ये दिसत आहे. त्याच्या हातात बंदूक आहे. तर त्याच्या मागे, एक संपूर्ण शहर जळत असल्याचे पोस्टरमध्ये दिसत आहे. हा चित्रपट १९ मार्च २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे.

# मला खूप ट्रोल केले

बॉलीवूडमधील काही कलाकार हे त्यांच्या चित्रपटांसाठी, अभिनयासाठी ओळखले जातात. आमिर खान हा अशाच लोकप्रिय कलाकारांपैकी एक आहे. अभिनेता आता लवकरच 'सितारे जमीन पर' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही दिवसांपूर्वी जेव्हा 'सितारे जमीन पर' या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला. तेव्हा अभिनेत्याचा हा चित्रपट २०१८ साली प्रदर्शित झालेल्या स्पॅनिश चित्रपट चॅम्पियन' चित्रपटाचा कॉपी आहे, असे नेटकऱ्यांनी म्हटले. अनेकांनी असेही म्हटले की आमिर त्याच्या अपयशातून काहीही शिकला नाही. २०२२ मध्ये प्रदर्शित झालेला 'लाल सिंग चड्डा' हा चित्रपटदेखील बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला होता. 'फॉरेस्ट गंप' या १९९४ साली प्रदर्शित झालेल्या चित्रपटाचा लाल सिंग च-ा हा रिमेक होता. आता अभिनेत्याने त्याचा रिमेक बनवण्याच्या निर्णयाचे समर्थन केले आहे. आमिर खान एका मुलाखतीत म्हणाला, 'लाल सिंग चड्डा' चित्रपटानंतर मला अनेकांनी म्हटले की तुम्ही परत रिमेक बनवत आहात. लाल सिंग चड्डाच्या वेळी मला खूप ट्रोल केले गेले होते. पण, मला वाटत नाही की रिमेक बनवल्याने माझी क्रिएटीव्हिटी कमी होते. कारण ते काम माझ्यासाठी नवीन आहे. नवीन दृष्टीकोणातून मी त्याच्याकडे बघतो. आमिर खान पुढे विल्यम शेक्सपिअरच्या नाटकाचे उदाहरण देत म्हणाला, जर मी शेक्सपिअरचे नाटक करत असेन तर मी स्वत:देखील त्यासाठी कष्ट घेतो. माझी स्वत:ची क्रिएटिव्हिटी वापरतो. त्यामुळे मी रिमेक चित्रपट बनवतो ही चर्चा मला वायफळ वाटते. जेव्हा मी 'गजनी' चित्रपट केला तेव्हा तो आधीच तमिळमध्ये झाला होता. पण, मी त्याकडे वेगळ्या दृष्टीकोणातून बघतो. माझ्या प्रेक्षकांसाठी माझी एनर्जी वापरून मी सिनेमा बनवतो. त्यामुळे मला वाटते की माझे काम त्यांच्यापेक्षा वेगळे आहे. दरम्यान, सितारे जमीन पर या चित्रपटात लोकप्रिय अभिनेत्री जिनिलीया देशमुखदेखील प्रमुख भूमिकेत दिसली आहे. नुकताच हा चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आहे. विशेष बाब म्हणजे त्यानंतर सितारे जमीन पर कोणत्याही ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार नाही. तर हा चित्रपट युट्यूबवर प्रदर्शित होणार आहे.






# प्रियंकाच्या 'हेड ऑफ स्टेट' चित्रपटाचा ट्रेलर रिलीज

अभिनेत्री प्रियंका चोप्राच्या 'हेड ऑफ स्टेट' या चित्रपटाची मागील काही दिवसांपासून चर्चा सुरू होती. अखेर या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. या चित्रपटात प्रियंकाने जॉन सीना आणि इद्रिस एल्बा यांच्यासोबत काम केले आहे. या चित्रपटातील तिच्या अभिनयाचे चाहत्यांकडून कौतुक केले जात आहे. २ मिनिटे ४६ सेकंदांच्या ट्रेलरमध्ये प्रियंकाचा ॲक्शन अवतार पाहायला मिळाला असून चाहत्यांच्या देखील तो पसंतीस पडला आहे. यात ब्रिटनचे पंतप्रधान सॅम क्लार्क (इद्रिस एल्बा) आणि अमेरिकेचे अध्यक्ष विल डेरिंगर (जॉन सीना) हे एका संकटात सापडतात, त्यानंतर प्रियंकाची एन्ट्री होती. ॲक्शन आणि कॉमेडीचा तडका असलेल्या या सिनेमाचा ट्रेलर सोशल मीडियावर ट्रेंड करत आहे. या चित्रपटासाठी प्रियंकाने खूप मेहनत घेतली आहे. शुटींगदरम्यान जखमी झाल्याचं फोटो देखील सोशल मीडियावर शेअर केले होते. अधिकृत माहितीनुसार, 'हेड्स ऑफ स्टेट' हा एक ॲक्शन-कॉमेडी चित्रपट आहे. हेड्स ऑफ स्टेट' २ जुलैपासून प्राइम व्हिडिओवर ऑनलाइन स्ट्रीम होईल. मात्र ट्रेलर पाहून चाहत्यांची चित्रपटाची उत्सुकता आणखी वाढली आहे.

# समांथानं नागाची 'ती' शेवटची आठवणही मिटवली



दक्षिणेतील प्रसिद्ध अभिनेत्री समांथा रूथ प्रभू सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. 'ये माया चेसावे' या तिच्या पहिल्या तेलुगू चित्रपटाच्या आठवणी जपत तिने पाठीवर 'YMC' हा टॅटू काढून घेतला होता. मात्र, अलीकडेच सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका व्हिडीओमध्ये तिचा हा टॅटू गायब झाल्याचं दिसून आलं. हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. समांथानं शेअर केलेला व्हिडीओ हा एक जाहिरातीचा आहे. या व्हिडीओमध्ये दिसतंय की, समांथानं एक ड्रेस परिधान केला असून तिच्या पाठीवर कुठेही 'YMC' टॅटू दिसत नाही. व्हिडीओच्या कॅप्शनमध्ये लिहिलंय, लपवण्यासारखं काहीच नाही. यामुळे चाहत्यांच्या चर्चेला उधाण आलं आहे. काही युजर्सनी कयास लावला की तिने टॅटू हटवला आहे, तर काहींनी म्हटलं की ती मेकअपने तो लपवला असेल. या टॅटूचा तिचा माजी पती नागा चैतन्य याच्याशी खोल संबंध होता. कारण, 'ये माया चेसावे' (२०१०) या चित्रपटादरम्यान त्यांच्या प्रेमकथेची सुरुवात झालीहोती. पुढे त्यांनी २०१७ मध्ये गोव्यात विवाह केला. मात्र, २०२१ मध्ये दोघांचा घटस्फोट झाला. दरम्यान, समंथाचं नाव आता 'Citadel: Honey Bunny' या वेबसीरिजचे दिग्दर्शक राज निदिमोरू यांच्यासोबत जोडलं जात आहे. रिपोर्ट्सनुसार, दोघं अनेकदा एकत्र दिसतात आणि समांथाने अनेकदा इंस्टाग्रामवर राजसोबतचे फोटोही शेअर केले आहेत. त्यामुळे हे नातं केवळ व्यावसायिक नसून खासगीही असल्याचे संकेत मिळत आहेत.



# या अभिनेत्रीला यायचंय सक्रीय राजकारणात

अभिनेत्री सायली संजीव मालिका, सिनेमांमधून लोकप्रिय झाली. मात्र ती राज्यशास्त्राचाही अभ्यास करत आहे हे खूप कमी जणांना माहित आहे. तसंच सायलीला खऱ्या आयुष्यात राजकारणात येऊन काम करण्याची इच्छा आहे. सायली सध्या मनसेच्या चित्रपट सेनेची उपाध्यक्ष आहे. एका मुलाखतीत सायली संजीव म्हणाली, हो, मला सक्रीय राजकारणात यायची इच्छा आहे. मला खरंच असं वाटतं की एक ध्येय ठेवलं पाहिजे. जेव्हा मी सक्रीय राजकारणात येईन तेव्हाच्या गोष्टी कदाचित बदलल्या असतील. त्यामुळे आजच्या समस्यांकडे लक्ष ठेवून मी ध्येय ठरवलं तरी तेव्हा त्याची कदाचित गरजच नसेल. मला शाळेत असल्यापासून वाटायचं की समाजात अमुक घडतं, तमुक घडतंय. मग आपली चिडचिड होते. हा रस्ता खराब, पाणी नाही, वीज नाही, काही गावांना जोडणारे रस्तेच नाहीयेत, तेव्हा मला वाटायचं की आपण आजूबाजूच्या गोष्टींबद्दल सतत तक्रारी करण्यापेक्षा हे सगळं करण्यात नक्की काय मेहनत असते यातून आपणही एकदा जाऊन बघूया फक्त शासनाला नावं ठेवण्यापेक्षा ही कामं करण्यात नक्की काय आव्हानं, अडचणी असतात हे बघितलं पाहिजे. ती पुढे म्हणाली, करिअरच्या दृष्टीने सुद्धा राजकारण हे उत्तम करिअर आहे. तरुणांसाठी तर हे खूप चांगलं आहे. आपल्याला आपलं शहर जसं हवं आहे तसं करायचं असेल तर यात तरुणांनी उतरणं आवश्यक आहे. माझं अभिनय पॅशन आहेच पण माझं दुसरं पॅशन राजकारण आहे. मी दहावीत असताना राज ठाकरेंची पहिली सभा पाहिली. त्यांच्या विचारांचा माझ्यावर खूप प्रभाव आहे. मी अभिमानाने सांगते की मी सध्या राज्यशास्त्राचा अभ्यास पूर्ण मराठीतून करत आहे.

# 'ऑल इज वेल'चा ट्रेलर प्रदर्शित



'तीन तिघाडा काम बिघाडा' ही म्हण खोटी ठरवत तीन मित्रांची धमाल दाखविणारा 'ऑल इज वेल' हा मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी २७ जूनपासून सर्वत्र प्रदर्शित होत आहे. तत्पूर्वी या चित्रपटाचा धमाकेदार ट्रेलर कलाकार व तंत्रज्ञांच्या उपस्थितीत नुकताच प्रकाशित झाला. याप्रसंगी निखळ हास्याची मेजवानी देणारा हा चित्रपट प्रेक्षकांना नक्की आवडेल, असा विश्वास दिग्दर्शक योगेश जाधव यांनी व्यक्त केला. तीन मित्रांची धमाल केमिस्ट्री आणि इतर कलाकारांचा मजेशीर अंदाज 'ऑल इज वेल' चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये दिसून येत आहे. या चित्रपटाच्या ट्रेलर प्रदर्शन सोहळ्यात बोलताना निर्माते अमोद मुचंडीकर, वाणी हालप्पनवर, तसेच सहनिर्माते मल्लेश सोमनाथ मरुचे, विनायक पट्टणशेट्टी म्हणाले की, 'काही तरी वेगळे करण्याच्या उद्देशाने आम्ही एकत्र आलो. प्रेक्षकांना धमाल करता येईल अशा कथानकाच्या शोधात असताना लेखक प्रियदर्शन जाधव, दिग्दर्शक योगेश जाधव आणि कार्यकारी निर्माते संजय दुबे यांच्या सहकार्याने हा धमाल विषय आम्ही आणला आहे. हा चित्रपट म्हणजे सहकुटुंब अनुभवायला मिळणारी हास्याची मेजवानी असून मनोरंजनाची अफलातून पर्वणी असणार आहे.' काही दिवसांपूर्वीच 'ऑल इज वेल' या चित्रपटाचे एक मजेदार पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आल्यानंतर चित्रपटाविषयी उत्सुकता अधिकच वाढली होती. त्यानंतर आता चित्रपटाचा धमाल ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. प्रियदर्शन जाधव, अभिनय बेर्डे, रोहित हळदीकर, सयाजी शिंदे, अभिजीत चव्हाण, नक्षत्रा मेढेकर, सायली फाटक, माधव वझे, अजय जाधव, अमायरा गोस्वामी, दिशा काटकर या कलाकारांची जमून आलेली उत्तम भट्टी काही तरी धमाल घडवणार हे ट्रेलरवरून आपसूकच जाणवत आहे. दिग्दर्शन योगेश जाधव, तर लेखन प्रियदर्शन जाधव यांनी केले आहे. नृत्य दिग्दर्शक राजेश बिडवे, कला दिग्दर्शन नितीन बोरकर, साहसदृश्ये अजय ठाकूर, वेशभूषा किर्ती जंगम, रंगभूषा अतुल शिधये यांची आहे. तर गीतकार मंदार चोळकर असून गायक रोहित राऊत, गायिका अपेक्षा दांडेकर यांनी चित्रपटातील गाणी गायली आहेत.

# सईला करायचं होतं आमिरशी लग्न



अभिनेता बॉलीवूडमध्ये आपल्या कामामुळे 'मिस्टर परफेक्शनिस्ट' म्हणून ओळखला जाणारा अभिनेता म्हणजे आमिर खान. वेगळ्या धाटणीचे विषय, सामाजिक विषयांवर आधारित चित्रपट आणि त्यातील खास भूमिकांसाठी आमिर खान ओळखला जातो. त्याचमुळे आमिरच्या अभिनयाचे लाखों चाहते आहेत. अशीच एक मराठी अभिनेत्रीही आमिरची खूप मोठी चाहती आहे, ही अभिनेत्री म्हणजे सई ताम्हणकर. मराठीसह हिंदीमध्ये आपल्या अभिनयानं प्रेक्षकांचं मनोरंजन करणाऱ्या सईने आमिर खानच्या 'गजनी' या चित्रपटातही काम केलं आहे. सईला आमिर इतका आवडायचा की, तिने लहानपणी आईकडे आमिरबरोबर लग्न करायची इच्छा व्यक्त केली होती. याबदलद स्वत: सईनेच खुलासा केला आहे. सईला एका मुलाखतीत 'तू आमिरची इतकी मोठी चाहती होतीस की, तू त्याचा 'दिल' नावाचा चित्रपट आला होता. तेव्हा त्या चित्रपटाच्या अनेक कॅसेट्स जपून ठेवल्या होत्या आणि आईला सांगितलं होतंस की, तुला आमिर खानशी लग्न करायचं आहे. त्यानंतर तू थेट त्याच्या चित्रपटात काम केलंस' असं म्हटलं. यावर सईने ही गोष्ट अगदी खरी असल्याचं सांगितलं. यावेळी सई म्हणाली, आज सोशल मीडियावर अनेक रिल्स येत असतात; त्यात ज्या गोष्टी हव्या आहेत, त्याबद्दल इच्छा कशा व्यक्त कराव्यात असं सांगतात. पण मला ते पटत नाही. मला वाटतं आपण आपल्याला हव्या असलेल्या गोष्टी नकळतपणेच मागतो. त्यापैकीच हे एक असावं. यानंतर सई म्हणाली, मला आमिर खूप आवडायचा, अजूनही आवडतो. त्यामुळे हे सगळं इच्छाशक्तीने जुळून आलं आणि 'गजनी' चित्रपट घडला असं मला वाटतं. माणूस एखाद्या विशिष्ट ठिकाणी पोहोचल्यानंतर हा विचार करतो की, आता माझ्याकडे गमावण्यासारखं खूप काही आहे. मी काय करू? पण तेव्हा माझ्याकडे गमावण्यासाठी काहीही नव्हतं. चित्रपटात इतकी छोटी भूमिका आहे; तर मी का करू? असा विचार केला असता तर ते कधीच घडलं नसतं.



# 'मुन्नी बदमान हुई'वर मलायकाचा भन्नाट डान्स

बॉलीवूड अभिनेत्री मलायका अरोरा तिच्या एका व्हायरल होणाऱ्या व्हिडीओमुळे चर्चेत आली आहे. एका कार्यक्रमात 'मुन्नी बदनाम हुई' या गाण्यावर मलायकाने डान्स केला आहे. या व्हिडीओमध्ये मलायकाच्या किलर मूव्हूजने चाहत्यांना घायाळ केले आहे. तिच्या डान्सचे कौतुक तिचे चाहते करत आहेत. तिचा आणखी व्हिडीओ व्हायरल झाला आहे. ज्या व्हिडीओमध्ये ती एका रेस्टॉरंटमधून बाहेर पडताना दिसत आहे. मलायका अरोराने टेलिव्हिजनवरील अनेक रिॲलिटी शोजचे परीक्षक म्हणून काम पाहिले आहे. सध्या ती 'हिप हॉप इंडिया' या शोच्या दुसऱ्या सीजनमधील परीक्षक आहे. तिने बॉलीवूडमधील अनेक चित्रपटांसाठी आयटम नंबर केला आहे. दंबग या चित्रपटातील मुन्नी बदनाम हुई या गाण्यामुळे मलायकाला खरी लोकप्रियता मिळाली. त्यानंतर तिने अनेक चित्रपटांसाठी देखील आयटम नंबर केले आहेत. मलायका नेहमी तिच्या फिटनेस मंत्राविषयी व्हिडीओ शेअर करत असतो. यामुळे वयाची पन्नाशी ओलांडल्यानंतरही ती तरूणच दिसते. यामागे ती कठोर परिश्रम घेते. तिला पाहून तिच्या वयाचा अंदाज लावणे कठीण आहे. मलायकाने अनेक रिॲलिटी शोमध्ये जजची भूमिका साकारली आहे. यामध्ये 'नच बलिये', 'झलक दिखला जा', 'इंडियाज गॉट टॅलेंट', 'एमटीव्ही सुपरमॉडेल ऑफ द इयर' आणि 'इंडियाज बेस्ट डान्सर' यांचा समावेश आहे.

# 'धुरंधर'मध्ये दिसणार नवा चेहरा



अभिनेता रणवीर सिंग हा त्याच्या वेगवेगळ्या धाटणीच्या चित्रपटांसाठी ओळखला जातो. 'बँड बाजा बरात'सारख्या चित्रपटातून सुरुवात करणाऱ्या रणवीर सिंहने सिनेसृष्टीत त्याची वेगळी अशी ओळख निर्माण केली आहे. लवकरच रणवीर आदित्य धर दिग्दर्शित धुरंधर चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटाची घोषणा झाल्यापासून सगळीकडेच चर्चा आहे. या मल्टिस्टारर चित्रपटात रणवीरसह, अर्जून रामपाल, संजय दत्त अशा कलाकारांची फौज आहे. परंतु, धुरंदर मध्ये रणवीरसोबत मुख्य नायिकेची भूमिका कोण साकारणार याबाबत अनेक दिवसांपासून चर्चा सुरु होती. त्यात बरीच नावंही समोर आली होती. दरम्यान, 'धुरंधर' चित्रपटात अभिनेत्री सारा अर्जुनची वर्णी लागली आहे. 'धुरंधर'मध्ये सारा अर्जुन दिसण्याची दाट शक्यता आहे. रणवीर सिंग १९ वर्षीय अभिनेत्री सारा अर्जुनसोबत पडद्यावर रोमान्स करताना दिसणार आहे. दोघांमधील वयामध्ये जवळपास २० वर्षांचं अंतर आहे त्यामुळे सोशल मीडिया यूजर्सनी ट्रोल करायला सुरुवात केली आहे. शिवाय काही चाहते निराश देखील झाले आहेत. परंतु. निर्मात्यांकडून अद्याप याबाबत कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. सारा अर्जुन ही मुळची मुंबईची रहिवासी आहे. २००५ मध्ये तिचा जन्म झाला. याआधी साराने इमरान हाश्मीच्या 'एक थी डायन' या हॉरर चित्रपटात काम केले आहे. याशिवाय, ती सलमान खानच्या 'जय हो' चित्रपटात एका शाळकरी मुलीची भूमिका साकारताना दिसली आहे. परंतु सारा अर्जुनला ऐश्वर्या रायच्या 'PS2' चित्रपटातून लोकप्रियता मिळाली. या चित्रपटात तिने ऐश्वर्याच्या बालपणीची म्हणजेच नंदिनीची भूमिका साकारली होती.



# कार्तिक, अनन्याच्या सिनेमातील लूकची होतेय चर्चा

अभिनेता कार्तिक आर्यन व अनन्या पांडे त्यांच्या आगामी चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यग्र आहेत. 'तू मेरी मैं तेरा, मैं तेरा तू मेरी' या चित्रपटातून ही जोडी लवकरच झळकणार आहे. मैं तेरा तू मेरी' या चित्रपटाच्या सेटवरील अनन्या व कार्तिक यांचे फोटो लिक झाले असून या चित्रपटातील त्यांचा लूक समोर आला आहे. व्हायरल फोटोमध्ये अनन्या पांडेचा लूक हा या चित्रपटाच्या पोस्टरवर असलेल्या लूकपेक्षा खूप वेगळा आहे. यामध्ये तिच्या केसांचा रंगही नेहमीपेक्षा वेगळा असून केसांना हायलाइट करण्यात आलं आहे. कार्तिक व अनन्या यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या फोटोंखाली त्यांच्या चाहत्यांनी कमेंट्स केल्या आहेत. या फोटोवर एका नेटकऱ्याने, 'मी युरोपमध्येच राहतो पण मी कधीही कोणाला फिकट रंगाचे कपडे परिधान केलेले किंवा इतके मोठे कानातले घालताना पाहिलेलं नाही', तर दुसऱ्या नेटकऱ्याने, 'त्यांनी इबेरियन टॅन्ड लूक केला आहे. इटली आणि स्पेन येथील महिला अनेकदा अशा लूकमध्ये पाहायला मिळतात.' कार्तिकने नुकताच क्रोएशिया येथील चित्रीकरण संपल्यानंतरचा एक व्हिडीओ शेअर केला होता, यामध्ये तो अनन्यासह 'धीमे धीमे'वरील स्टेप्स करताना दिसला होता. दरम्यान, 'तू मेरी मैं तेरा, मैं तेरा तू मेरी' या चित्रपटाचं दिग्दर्शन मराठमोळे दिग्दर्शक समीर विद्वंस करत आहेत. या चित्रपटाची कथा करण शर्मा यांनी लिहिली आहे, तर चित्रपटाची निर्मिती करण जोहरच्या 'धर्मा प्रोडक्शन'ने केली आहे. समीर विद्वंस यांनी यापूर्वी कार्तिक आर्यन व कियारा यांची मुख्य भूमिका असलेल्या 'सत्य प्रेम की कथा' या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं होतं. यानंतर आता पुन्हा एकदा कार्तिक त्यांच्या चित्रपटातून मुख्य भूमिकेत झळकणार आहे.

# सिनेसृष्टीच्या अंगणातील तुळस ः

# नूतन

**'सुनो छोटी सी गुडिया की लंबी कहानी जैसे तारों की बात सुने रात सुहानी...' १९५५ सालच्या 'सीमा' चित्रपटातील लता मंगेशकरांच्या करुण रसात भिजलेल्या या गीतात, एका स्त्रीच्या स्वप्नांचा चुराडा होऊन दुःख कसे नशिबी आले, हे अत्यंत प्रभावीपणे नूतन यांनी अभिनित केले. एका बाहुलीला प्रतीक स्वरूप हातात घेऊन फ्लॅश बॅकमध्ये स्वतःचे पूर्व जीवनभाव गर्भित अभिनयात प्रतीत करतात. 'टूटे पलभर में सपने के मोती भी लूट गये ज्योती भी रह गये अंधेरे' या गाण्याद्वारे. 'मन मोहना बडे झूटे। हार के भी हार नही माने' याच चित्रपटात राग 'जयजयवंती'वर आधारलेले हे गीत गाताना नूतन यांच्या चेहऱ्यावरील शांत व पवित्र भाव अप्रतिम आहे.**



एका दुसऱ्या प्रसंगात जेव्हा ती क्रोधात उद्विग्न होते व मानसिक तोल सुटतो तेव्हा 'मनमोहना, मोहना, मोहना...' असे म्हणत खिडक्यांचे काच, खुर्च्यांची मोडतोड वगैरे करून क्षोभ व्यक्त करतानाचा अफलातून अभिनय करताना अभिनयाच्या सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. नूतन ह्या केवळ एक अभिनेत्री नव्हत्या, तर स्त्री जीवनाच्या सोशिकतेचे त्या पडद्यावरील प्रतीकात्मक स्वरूप होत्या. चित्रपटरूपी दिंडीच्या मुख्य पालखीचे भोई होण्याचा मान त्यांनी प्राप्त केला होता. 'सिनेमा संगीतस्य कारनम' केवळ नसून 'सिनेमा अभिनयस्य कार नम'ही असतो, हे त्यांनी दाखवून दिले होते. सीमा चित्रपटातील नूतन यांच्या अभिनय सामर्थ्याने प्रभावित होऊन तत्कालीन महामहिम बिमल रॉय यांनी नूतनसाठी 'सुजाता' या चित्रपटाची निवड केली.

नूतन ह्या कलश्रेष्ठीचा जन्म ४ जून १९३६ रोजी मुंबईत कवी, दिग्दर्शक व संकलक कुमारसेन समर्थ व बोलपटाला सोनियाचा दिनू प्राप्त करून देणाऱ्या सुप्रसिद्ध अभिनेत्री निर्मात्या व निर्देशिका शोभना समर्थ यांच्या पोटी झाला. लहान असताना नूतन फार रडायच्या तेव्हा एका सत्पुरुषाने सांगितले की, मुक्ती मिळालेला हा आत्मा आहे. काही कर्म बाकी होते म्हणून हा जन्म झाला. जन्माला यायचे नव्हते म्हणून रडते. तत्कालीन सुप्रसिद्ध व्यक्तिमत्व गौतम राजाध्यक्ष म्हणाले. आपल्या कलेने आनंद देत स्वतः केवळ दुःख जगून या आत्म्याने शुद्धी करून घेतली म्हणून असे म्हणता येईल नूतनला निर्वाण मिळालंय. नूतनच्या बालपणापासूनच घरातील वातावरण सिनेमाचे होते. तिची आजी रतनबाई शिलोत्री, आई शोभना समर्थ, वडील कुमारसेन समर्थ. मुंबईत पंडित जगन्नाथ प्रसाद यांच्याकडे शास्त्रीय संगीत व पं. मोहनलाल पांडेंकडे कथक नृत्य शिकल्या. ९ वर्षांची असताना वडिलांच्या 'नल-दमयंती' चित्रपटात बालकलाकार म्हणून काम केले. १९५० साली तिच्या आईच्या शोभना प्रॉडक्शनच्या 'हमारी बेटी' चित्रपटात नायिका म्हणून काम केले.

स्नेहल भाटकर या संगीतकाराने नूतनकडून एक मजेदार व चिडविणारे गाणे या चित्रपटात म्हणवून घेतले. हे तिचे पहिले गाणे ठरले. त्या अभिनय क्षेत्रात आल्या नसत्या तर गायिका म्हणून नाव कमाविले असते. १९५१ साली 'मिस इंडिया' व १९५२ साली 'मिस मसूरी' या सन्मानाने सुशोभित झाल्या. त्यानंतर त्यांनी ११ चित्रपट केले. त्यातील हमारी बेटी, हमलोग व नगीना हेच चित्रपट चाललेत. पण नूतनच्या अभिनयाची छाप पडली. तरीही प्रिंट मीडियात त्यांना 'हॅम ॲक्टरेस', अनलकी गर्ल, फ्लॉप गर्ल आदी दूषणे मिळालीच. त्या मनातून दुःखी झाल्यात. वरील चित्रपटांचा अनुभव घेऊन त्या स्वीत्झर्लंडला गेल्या. त्यावेळी त्या केवळ १७ वर्षांच्या होत्या. तिथे त्यांनी सेक्रेटरिअल कोर्स केला. फ्रेंच भाषा शिकल्या. स्वीत्झर्लंडहून आल्यावर त्यांनी अमिया चक्रवर्ती यांचा 'सीमा' चित्रपट केला आणि या यशाने त्या मान्यवर व कलात्मक अभिनेत्री ठरल्यात.



राज कपूर यांच्यासोबत 'कन्हैया', 'अनाडी', 'छलिया' ई. चित्रपट करून मोठे यश व कीर्ती मिळवली. 'क्यू? बेखबर, यूं खिचीसी चली जा रही मै ये कोनसे बंधनोमे बंधी जा रही मै' 'अनाडी'मध्ये राज कपूरच्या निष्पाप अंतरंगाचा उदार मनाने स्वीकार करताना प्रेमात पडते व प्रेमाच्या बेहोशीत नायकाच्या समीप केव्हा येते कळतच नाही, हे सर्व भाव उत्तुंग अभिनयात साकारले. शोभना समर्थ यांनी दुसरी मुलगी तनुजाला पुढे आणण्यासाठी १९६० साली 'छबीली' चित्रपट काढला. यात नूतनने तनुजाच्या मोठ्या बहिणीचे काम उत्कृष्ट केले. त्यात नूतन यांनी खालील उत्कृष्ट गाणे गाऊन पुन्हा आपले गायकित्व सिद्ध केले. 'ए मेरे हमसफर ले, रोक अपनी नजर' नूतन यांच्या स्वरातील नवथर कंपनांचा वापर संगीतकार स्नेहल भाटकर यांनी खुबीने करून घेतला. याच सुमारास नेव्ही ऑफिसर रजनीश बहलसोबत नूतन यांचा विवाह झाला. पतीची इच्छा असूनही चित्रपट संन्यास घेण्याचे नूतन यांनी ठरविले. चित्रपटसृष्टीत चिंता पसरली. दरम्यान, बिमल रॉय यांनी नूतन यांना समोर कल्पून 'बंदिनी' या चित्रपटाची घोषणा केली होती. बिमल रॉयच्या शब्दांना मान देऊन नूतन यांनी बंदिनी हा कलात्मक चित्रपट स्वीकारला.

१९६८ सालच्या 'सरस्वती चंद्र' चित्रपटातील हे प्रसिद्ध गाणे नूतन यांच्या अभिनय आविष्कारामुळे व इंदिवर यांच्या शब्दांमुळे आजही लक्षात राहते. कारकीर्दीच्या ढळत्या काळात १९७८ साली 'मै तुलसी तेरे आंगन की' या चित्रपटातील त्यांचा अभिनय म्हणजे आजवरच्या सर्व चित्रपटातील अभिनयावर कळसच होता. १४ ऑगस्ट १९६१ रोजी मोहनीश बहल या अपत्यास जन्म दिला. तेही आता मोठे कलाकार आहेत. नूतन यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून पाच वेळा व सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेत्री म्हणून एक वेळ असे सहा फिल्मफेअर अवॉर्ड मिळालेत. त्यांनी ८० हून अधिक चित्रपटात कामे केलीत. १९७४ साली सर्वोच्च नागरी पुरस्कार 'पद्मश्री'च्याही त्या मानकरी झाल्या. २१ फेब्रुवारी १९९१ रोजी कॅन्सरचे निमित्त होऊन त्यांना काळाने गाठले. त्यांनीच लिहून ठेवलेले काव्य त्या जगल्या. 'मन के सुख सागरमे, मै डूब के सो जाऊ सपना भये जग सारा, मै हो जाऊ...'

**रमेश पोफळी**

# नवाजुद्दीन अजूनही संघर्ष करतोय!



नवाजुद्दीन सिद्दीकीने जॉन मॅथ्यू मॅथनच्या १९९९ मध्ये आलेल्या 'सरफरोश' या चित्रपटातून पदार्पण केलं होतं. पण, त्याला खरा ब्रेक मिळाला तो अनुराग कश्यपच्या 'गँग्स ऑफ वासेपूर पार्ट -२' या चित्रपटातून. २०१२ साली हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. यामधील त्याच्या भूमिकेने प्रेक्षकांचं लक्ष वेधलं होतं. नवाजुद्दीन आता अनेक चित्रपटांमध्ये मुख्य भूमिका साकारताना दिसतो. पण, इथपर्यंतचा त्याचा प्रवास सोपा नव्हता. त्याला चित्रपटांमध्ये महत्त्वाच्या भूमिका मिळण्याआधी १२-१५ वर्षे संघर्ष करावा लागल्याचं अभिनेत्याने सांगितलं आहे. अशातच आता नवाजुद्दीन सिद्दीकीने त्याच्या 'मैं क्टर नही हू' या चित्रपटाबद्दलही सांगितलं आहे. या चित्रपटामध्ये त्याने संघर्ष करणाऱ्या एका कलाकाराची भूमिका साकारली आहे. याबाबत नुकतंच त्याने 'स्क्रीन'शी संवाद साधला आहे. यादरम्यान त्याला एका अभिनेत्यासाठी संघर्ष करणाऱ्या कलाकाराची भूमिका साकारणं सोप असतं की कठीण असा प्रश्न विचारण्यात आला होता. नवाजुद्दीन विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर देताना म्हणाला, हे खूप सोपं आहे, कारण मी खूप काळ संघर्ष केला आहे. जवळपास १२-१५ वर्षे मी संघर्ष केला आहे आणि अजूनही माझा संघर्ष सुरू आहे. पण, जेव्हा तुमच्याकडे अनुभव असतो तेव्हा ती भूमिका साकारणं तुमच्यासाठी सोपं जातं. दिग्दर्शक आदित्य कृपलानी म्हणाले, पहिल्या दिवसापासूनच त्याने वाईट अभिनय करणाऱ्या कलाकाराची भूमिका चोख पार पाडली आहे. कारण कुठेही त्याचा अभिनय खोटा किंवा नाट्यमय वाटला नाही. त्याने खूप नैसर्गिक अभिनय केला आणि माझ्या मते हीच त्याच्यासाठी मोठी पोचपावती आहे. दरम्यान, 'मैं क्टर नही हू' या चित्रपटाबद्दल बोलायचं झालं तर या चित्रपटाचं दिग्दर्शन आदित्य कृपलानी यांनी केलं आहे. मार्च २०२५ ला कॅलिफोर्नियामध्ये या चित्रपटाचा प्रीमियर पार पडला होता. आता लवकरच हा चित्रपट भारतात प्रदर्शित होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. हिंदी व इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये हा चित्रपट बनवला गेला आहे. हा चित्रपट निवृत्त बँकर आणि एका अभिनेत्यामध्ये अभिनय शिकण्याच्या प्रवासावर आधारित आहे. यामध्ये नवाजुद्दीन सिद्दीकी व चित्रांगदा सतरूपा महत्त्वाच्या भूमिकेत आहेत.

# नीसा देवगण लवकरच करणार बॉलीवूड डेब्यू?

बॉलीवूड अभिनेत्री काजोल सध्या तिच्या आगामी 'माँ' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. अभिनेत्री या चित्रपटाचे जोरदार प्रमोशन करताना दिसत आहे. लवकरच हा चित्रपट थिएटर्समध्ये प्रदर्शित होणार आहे. दुसरीकडे काजोलची मुलगी नीसा देवगण लवकरच बॉलीवूड डेब्यू करणार असल्याच्या चर्चा रंगू लागल्या आहेत. सुरू असलेल्या चर्चांवर काजोलने स्पष्टीकरण देत एकाच वाक्यात उत्तर दिले आहे. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत काजोलने तिची मुलगी नीसा देवगणच्या अभिनयातील रुचीबाबत भाष्य केले आहे.

अभिनेत्रीला विचारण्यात आले की मुलीला चित्रपटांमध्ये आणण्याचा विचार आहे का? यावर उत्तर देताना अभिनेत्री म्हणाली, 'नाही, मला वाटत नाही की ती हे करेल, तिला चित्रपटांमध्ये अभिनय करण्यात अजिबात रस नाही, असे उत्तर काजोलने दिले आहे. मला माझ्या कुटुंबातील सर्व मुले खूप आवडतात. मला असं वाटत की त्यांना जे हवे आहे त्यांने ते करावे, असे म्हणत तिने निर्णय घेण्याचे सर्वाधिकार तिच्या मुलीवर सोपवले आहेत.



यामुळे नीसा बॉलीवूडमध्ये एन्ट्री करणार असल्याच्या चर्चांना फुलस्टॉप लागला आहे. मात्र, नीसा आगामी काळात फिल्म इंडस्ट्री हे करिअर म्हणून निवडणार का हे पाहावे लागणार आहे. माझ्या मुलांना माझे चित्रपट आवडत नाहीत, कारण मला त्यात रडावे लागते आणि त्यांना त्यांच्या आईला मोठ्या पडद्यावर रडताना पाहणे आवडत नाही. मला रडताना पाहून नीसा आणि युग खूप घाबरतात, असे देखील काजोलने या मुलाखती दरम्यान सांगितले आहे. काजोल तिच्या आगामी माँ चित्रपटातून मोठ्या पडद्यावर मोठ्या ब्रेकनंतर आगमन करणार आहे. २७ जून २०१५ रोजी हा चित्रपट थिएटर्समध्ये रिलीज होणार आहे.



# मी कधीच आनंदी नसतो

बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्याने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीमध्ये तो स्वत:चा खूप मोठा टीकाकार असल्याचं म्हटलं आहे. खरतर तर या अभिनेत्याने साकारलेल्या प्रत्येक भूमिकेला प्रेक्षकांचा आजवर चांगला प्रतिसाद मिळाला आहे. हा अभिनेता म्हणजे आदित्य रॉय कपूर. आदित्यचा खूप मोठा चाहतावर्गही आहे. अशातच अभिनेत्याने नुकतीच एक मुलाखत दिली आहे. यामध्ये त्याने तो स्वत:चा मोठा क्रिटिक असल्याचं म्हटलं आहे. आदित्यने केलेल्या कामासाठी तो समाधानी नसल्याचंही त्याने सांगितलं आहे. आदित्यने त्याच्या कामाबद्दल सांगितलं आहे.

आदित्यला तू तुझ्या कामावर टीका करतो का? तू केलेल्या कामाबद्दल तुला काय वाटतं, याबद्दल विचारण्यात आलं होतं. यावर आदित्य म्हणाला, हो, मी स्वत:चा खूप मोठा क्रिटिक आहे. मी कधीच आनंदी नसतो, कधीच समाधानी नसतो, मला नेहमी असंच वाटतं की मी अजून चांगलं काम करू शकलो असतो. करिअरच्या सुरुवातीला मी काम झाल्यानंतर घरी जाऊन बराच वेळ विचार करायचो की मी अजून चांगलं काम करू शकलो असतो. पण, वेळेनुसार माझ्यामध्ये बदल होत गेले आणि मला कायम माझ्या कामाबद्दल असंच वाटत राहणार आहे किंवा आपल्याला आपण केलेल्या कामाबद्दल असंच वाटतं हे मला आता पटलं आहे. आदित्य पुढे म्हणाला, आता दिवस संपला की मी हा विचार करत नाही. तुमचा माइंडसेट महत्त्वाचा असतो, कारण केलेल्या कामाबद्दल सारखा विचार करून काहीच हाती लागत नाही. पण हो, मी स्वत:चा खूप मोठा टीकाकार आहे. मी तेच करतो, जे माझ्या आणि दिग्दर्शकाच्या दृष्टीने योग्य असतं. आदित्य पुढे म्हणाला, स्वत:च्या कामावर टीका करणं, आपण केलेल्या कामात कुठे चुकलो हे पाहणं गरजेचं असतं असं मला वाटतं. पण, आता मी हळू हळू माझ्या कामावर उगाच फार टीका न करता चुकलं असेल तर मान्य करून सोडून दतो आणि पुढे जातो; कारण जर दिग्दर्शक माझ्या कामामुळे आनंदी असेल तर मग मीच स्वत:वर टीका करण्यात काहीच अर्थ नाही. आदित्यने यावेळी दिग्दर्शक व कलाकार यांच्यामध्ये चांगले संबंध असणं, त्यांनी एकमेकांसह चित्रपटाचं चित्रीकरण सुरू होण्यापूर्वी अनेक विषयांवर त्यांची मतं मांडली, संवाद साधला तर पुढे काम करायला सोप जातं,असं म्हटलं आहे. तुम्ही करत असलेल्या चित्रपटाबद्दल तुमची काय मतं आहेत हे जाणून घेणं आणि तुमचे विचार जुळणं म्हत्त्वाचं आहे. कारण जर कलाकार आणि दिग्दर्शकामध्ये वैचारिक मतभेद असतील तर मग काम करणं कठीण होतं. दरम्यान, आदित्य लवकरच 'मेट्रो इन दिनो' या त्याच्या आगामी चित्रपटामधून झळकणार आहे.